ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 9 | ISSUE - 7 | MARCH - 2023

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# महाराष्ट्राची आर्थिक राजधानी नवी मुंबईचे शिल्पकार श्री वसंतरावजी नाईक साहेब



**रोहित बाबूसिंग चव्हाण**
**संशोधक विद्यार्थी,**
**मु.पो. कळंबा (बोडखे) , ता. मगरुळपोर जि. वाशिम.**

## प्रस्तावना:-

यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यात नाईक घराणे अतिशय लोकप्रिय आहे. कारण या नाईक घराण्यातील प्रत्येक व्यक्तीने आपल्या कर्तृत्वाच्या प्रकाशाने लोकांना मंत्रमुग्ध करून समाज परिवर्तन घडवून आणले आहे. वसंतरावजी नाईक यांना समाज परिवर्तन घडविण्याचे सामर्थ्य त्यांच्या पूर्वजांकडून मिळालेल्या संस्कारांमुळे शक्य झाले.

बंजारा समाज हा गावाच्या बाहेर डोंगराच्या पायथ्याशी तांड्यातोड्याने म्हणजेच छोटीशी गावे करून राहणारा भटक्या प्रवृत्तीचा समाज होता. या समाजात तांड्याचा प्रतिनिधी म्हणून नाईक निवडण्यात येते असे गहुली या गावातील तांड्याच्या लोकांनी वसंतराव नाईक यांचे आजोबा चतुरसिंग राठोड यांना तांड्याची नाईक म्हणून नियुक्त केले होते व तेव्हापासून राठोड घराने नाईक करण्यात रूपांतर झाले. चतुरसिंग नाईक यांनी नाईक घराने गहुली या गावात स्थायिक केले व त्यानंतर त्यांचा मुलगा फुलसिंग नाईक यांच्याकडे या तांड्याची नेतृत्व सोपवण्यात आले.

फुलसिंग नाईक यांनी तांडा प्रमुखाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर त्यांचा विवाह हुनकीबाई यांच्याशी झाला.

## शैक्षणिक प्रवास:-

फुलसिंग नाईक फारशे शिक्षित नव्हते परंतु त्यांच्या मनात विचारात समाजाबद्दल प्रेम समाज परिवर्तन करण्याची तळमळ होती, समाजाचा उद्धार करायचा असेल तर त्याला शिक्षणाची जोड असावी लागते हे त्यांना जाणवले होते त्यामुळे त्यांनी वसंतराव नाईक यांना शिकवायचे ठरवले. फुलसिंग नाईक यांनी वसंतराव नाईक यांना बालपणापासूनच शिक्षण, समाजसेवा, सहकार, सेवावृत्ती ची शिकवण दिली. फुलसिंग नाईक यांनी दिलेल्या प्रेरणा व संस्काराचे सार्थ ठरवीत वसंतराव नाईक स्वतःच्या कर्तृत्वाच्या बळावर संपूर्ण महाराष्ट्रात नाईक घराण्याचे नाव मोठे केले.

वसंतराव नाईक यांचा जन्म १ जुलै १९१३ रोजी यवतमाळ जिल्ह्याच्या पुसद तालुक्यातील गहुली या खेडेगावात बंजारा समाजातील एका सामान्य शेतकरी कुटुंबात झाला. वसंतराव नाईक यांचे पिता फुलसिंग नाईक आणि मातोश्री हुनकीबाई वसंतरावांना एक वडील बंधू राजूसिंग उर्फ बाबासाहेब नाईक आणि चार बहिणी होत्या. संस्काराचे खरे बीज हे कुटुंबाकडून रुजवल्या जाते त्यामुळे कुटुंब हेच संस्काराचे पाठशाला असते. आई-वडिलांनी बालपणी आपल्या मुलांना दिलेले संस्कार मुलांना भविष्य घडण्यास प्रेरणादायी ठरतात वसंतराव नाईक यांचे बालपण गहुली गावातच कुटुंब व मित्राबरोबर हसत खेळत आनंदमय वातावरणात पूर्ण झाले. शिक्षण घेत असताना सामाजिक व सार्वजनिक संस्कार त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण झाली.

वसंतराव नाईक यांची कर्मभूमी म्हणून ओळखली जाणारी पुसद नगरी आता विदर्भातील शैक्षणिक आघाडीवरची दर्जेदार नगरी बनली आहे. परंतु वसंतरावांचा जन्म झाला तो काळ या परिस्थितीच्या अगदी उलट होता कारण त्या काळात गहुली या गावात शिक्षणाची चाहूलही नव्हती. मुलांना शिक्षणाकरिता जवळच्या गावात जाऊन शिक्षण पूर्ण करावे लागत असे गहुली या गावात शिक्षण आणि वाहतुकीची व्यवस्था नव्हती. त्यामुळे वसंतरावांनी पाचवी पर्यंतचे प्राथमिक शिक्षण पोहरा, उमरी, बासी भोजला व विठोली या विविध

गावाच्या शाळेतून पूर्ण केले. प्राथमिक शिक्षण पूर्ण झाल्यानंतर माध्यमिक शिक्षणाकरिता वसंतरावांनी अमरावती व नागपूर या शहराची निवड केली. १९३३ मध्ये नागपूर येथील निल सिटी हायस्कूल मधून मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण केली. १९३७ मध्ये मॉरिस कॉलेज (सध्याचे वसंतराव नाईक सामाजिक विज्ञान संस्थ नागपूर) येथून बी. ए. ची पदवी प्राप्त केली. वसंतराव विद्यार्थीदशेत शांत, खेळीमेळीने वागणे, प्रेमळ भाषा बोलणे, मनमिळवू स्वभाव इत्यादी गुणांमुळे वर्गात लोकप्रिय होते. वसंतरावांचे मराठी भाषा व साहित्य यावर प्रभुत्व होते त्यामुळे त्यांनी मराठी विषयात पारंगत होण्यासाठी एम.ए. मराठी विषयाची निवड केली. परंतु हा अभ्यासक्रम अर्धवट सोडून त्यांनी नागपूर विधी महाविद्यालयात एल.एल.बी. पदवी करिता आपले नाव दाखल केले. १९४० मध्ये एल.एल.बी. पदवी उत्तीर्ण केली ही पदवी उत्तीर्ण केल्यानंतर वसंतरावांनी वकिलीच्या व्यवसायास प्रारंभ केला.

वसंतराव नाईक यांनी १९४० मध्ये नागपूर विधी महाविद्यालयातून एल.एल.बी. पदवी उत्तीर्ण केली. पदवी मिळाल्यानंतर वसंतरावांनी १९४१ मध्ये प्रारंभी अमरावतीचे प्रख्यात वकील कै. पंजाबराव देशमुख यांच्या बरोबर काही काळ व नंतर पुसद येथे स्वतंत्रपणे वकिलीचा व्यवसाय प्रारंभ केला. वसंतरावांनी वकिली व्यवसाय पैसा कमवण्याच्या दृष्टीने सुरू केला नाही तर समाज कार्याच्या साधन म्हणून गोरगरिबांना साहाय्य करण्यासाठी केले. बंजारा समाज अतिशय गरिबीने ग्रासलेला होता. शिक्षणाची फारशी सुविधा नव्हती त्यामुळे वसंतरावांनी या वकिलीच्या साहाय्याने सावकार व गरीब वर्गातील तफावत कमी करण्याच्या उद्देशाने कार्य केले. वसंतरावांना अल्पकाळातच आपल्या कर्तृत्वाची मोहर यवतमाळ शहरात यशस्वी वकील म्हणून नावलौकिक मिळाले. वसंतराव नाईक हे बंजारा समाजाचे पहिले वकील होते.

### मागासवर्गीय समाजाप्रती दृष्टिकोन:-

वसंतरावांना त्यांच्या कुटुंबाकडून व समाजाकडून मिळालेल्या संस्कारांमुळे वसंतरावांनी बंजारा समाज आणि इतर मागासवर्गीय समाजाला केंद्रस्थानी ठेवून धार्मिक, अंधश्रद्धा, रूढी परंपरा, शिक्षणाबद्दलची उदासीनता दूर करण्याकरिता अनेक मार्गाने पराकाष्टा केली व स्वतःच्या कर्तुत्व कृतीशील कार्याने समाजात एक आदर्श सामाजिक कार्यकर्ता म्हणून नावलौकिक मिळवले. वसंतराव नाईक यांच्यावर महात्मा फुले, साने गुरुजी यांचे विचार आणि साहित्याचा पगडा होता. अस्पृश्यतानिवारण स्त्री शिक्षण, समाज जागृती करिता डॉ. बाबासाहेब आंबेडकर व डेल कार्नेजी यांचा सामाजिक लढा व कार्याचा प्रभावामुळे वसंतरावांच्या मनात सामाजिक कार्याची प्रेरणा रुजली.

### राजकीय प्रवास:-

वसंतरावांचा समाजकार्यातून राजकारणाचा प्रवास सुरू झाला तो पुसद नगर परिषदेच्या अध्यक्षपदापासून मजलदरमजल करीत थेट महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदापर्यंत जाऊन पोहोचला वसंतरावानी १९४० मध्ये पुसद नगरपरिषदेची निवडणूक जिंकून नगराध्यक्ष पदावर निवडून आले. १९५२ पर्यंत याच पदावर ते कार्यरत होते. या पदावर असताना वसंतरावांनी नगरपालिकेच्या कक्षेत येणाऱ्या शिक्षण, पाणीपुरवठा, आरोग्य, रस्ते, वीज या महत्त्वपूर्ण बाबी वर लक्ष केंद्रित करून पुसद तालुक्याचा विकास घडवून आणला. वसंतराव नाईक १९५२ मध्ये काँग्रेसतर्फे विधानसभेच्या पहिल्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आल्याने त्यांची मध्यप्रदेश मंत्रिमंडळात महसूल खात्याचे उपमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली. याच काळात त्यांनी मध्यप्रदेश गृहनिर्माण मंडळाचे अध्यक्षपद तसेच मध्य प्रदेश भू-सुधार समितीचे उपाध्यक्ष व मध्य प्रदेश सरकारच्या मॅट्रीक समितीचे अध्यक्ष होते. १९५६ मध्ये राज्य पुनर्रचनेनंतर जुन्या मुंबई राज्यात सहकार, कृषी, दुग्ध व्यवसाय या खात्याचे मंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली.

१ मे १९५६ रोजी द्विभाषिक मुंबई राज्याची स्थापना झाली. महाराष्ट्राचे शिल्पकार श्री यशवंतराव चव्हाण याच्या मंत्रिमंडळात नाईक यांना सहकार मंत्र्यांचे पद देण्यात आले. त्यानंतर १९५७ च्या दुसऱ्या सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आल्यावर महाराष्ट्र मंत्रिमंडळातील कृषिमंत्री म्हणून निवडण्यात आले.

वसंतरावांनी कृषिमंत्री असताना शेती विकासाच्या विविध योजना आखल्या व यशस्वीरीत्या राबवून शेतीचा विकास घडून आणला. १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याच्या स्थापनेनंतर राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळात यशवंतरावानी महसूल खात्याची जबाबदारी वसंतरावांकडे दिली. या जबाबदारीची दखल घेऊन वसंतरावांनी अनेक महत्त्वपूर्ण कार्य केले. याच काळात वसंतरावांनी लोकशाही विकेंद्रीकरण समितीचे अध्यक्ष म्हणून काम केले व महाराष्ट्रात पंचायत राज राज्याची मुहूर्तमेढ रोवली. १९६२ च्या सार्वत्रिक निवडणुकीत महाराष्ट्र विधानसभेवर यवतमाळ जिल्ह्यात पुसद मतदार संघातून वसंतरावांनी तिसऱ्यांदा निवड होऊन पुन्हा महसूल मंत्री म्हणून नियुक्त

करण्यात आली. १९६२ ते २४ नोव्हेंबर १९६३ पर्यंत दादासाहेब कन्नमवार हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री होते. मात्र त्यांच्या आकस्मिक मृत्युनंतर ५ डिसेंबर १९६३ रोजी वसंतराव नाईक यांची महाराष्ट्राच्या मुख्यमंत्री पदावर नियुक्ती करण्यात आली.

**महाराष्ट्र सुजलाम सुफलाम:-**

वसंतराव नाईक यांनी आपल्या प्रदीर्घ मुख्यमंत्री कारकिर्दीत महाराष्ट्र राज्याचा चेहरामोहरा बदलून टाकला. शेती, महसूल राज्यभाषा, दारूविक्री, सरकारी कार्यकारिणीला कार्यप्रवण करणे या सोबतच दुष्काळ या नैसर्गिक आपत्तीवर मात करण्याची विविध विकासात्मक योजनाची अंमलबजावणी केली. शेती व उद्योगधंद्यासाठी वीज व पाणी उपलब्ध करून दिले कृषीवर आधारित उद्योगाला चालना देण्यासाठी सूतगिरणी, दुग्धोत्पादन, कुक्कुटपालन आदी शेतीपुरक उद्योगास प्रोत्साहन दिले. शेतकऱ्यांना चांगले बियाणे उपलब्ध व्हावे म्हणून महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ ची स्थापना त्यांच्याच काळात झाली. महाराष्ट्र राज्याची चौफेर बांधणीही वसंतराव नाईक यांच्या काळातच सर्वाधिक झालेली आहे. किंबहुना १९६० ते १९७८ या अवघ्या पंधरा वर्षांच्या काळात शेती, धरणे, बीज, रस्ते, शिक्षण, ग्रामीण विद्युतीकरण, कृषी विद्यापीठ, नवी मुंबई ची स्थापना नव्या औरंगाबादची निर्मिती ही सगळी प्रकल्प वसंतरावांच्या मुख्यमंत्रीपदावर असताना पूर्ण झालेली आहेत. त्यामुळेच वसंतराव नाईक यांना महाराष्ट्राचे आधुनिक शिल्पकार व नवी मुंबईचे शिल्पकार असे म्हटले जातात.

**दूरदृष्टी ठेऊन नवी मुंबईची स्थापना:-**

अवाढव्य अजगरासारखी वाढलेली मुंबई, त्यामधील वाढलेली लोकसंख्याची गर्दी, अपूर्ण रस्ते वाहनांची वाढती संख्या, राहायला घरे न मिळणे, दक्षिण मुंबईच्या चिंचोळ्या भौगोलिक भागात वाढ व्हायला वाव नसणे, ही सर्व कारणे लक्षात घेऊन
वसंतराव नाईक यांनी मुंबईला पर्याय म्हणून नवी मुंबई ची रचना केली. नवी मुंबईच्या निर्मितीला सैद्धांतिक रूप देण्यासाठी सिटी इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन म्हणजेच सिडको या व्यवस्थेमार्फत नवी मुंबई आणि औरंगाबाद यांची वसाहत शिस्तबद्ध रीतीने उभारण्याचा वसंतराव नाईक यांचा निर्णय ४० वर्षापूर्वीचा आहे. आज नव्या मुंबईत झगमगाट आहे. नवी मुंबई हे शहर विकासाच्या दृष्टीने राज्यातील तीन नंबरचे शहर झाले आहे. मुंबई हे शहर आजही लोकसंख्या, शहरीकरण, दारिद्र्य, बेरोजगारी, वाहतूक व्यवस्थेने गुदमरलेल्या आहे त्यामुळे नाईक साहेबांनी नवी मुंबई ची रचना केली नसती तर महाभयंकर परिस्थिती निर्माण झाली असती.

नवी मुंबई प्रस्थापित करण्याचा निर्णय १९७२ साली अमलात आणण्यास सुरुवात झाली. पश्चिम किनारपट्टीला लागून नवी मुंबई बसवण्याचा निर्णय वसंतरावांनी चाळीस वर्षांपूर्वी घेतला. ३४४ चौ. किलोमीटर जमीन त्यासाठी संपादित करण्यात आली चाळीस वर्षांपूर्वी बांधकामासाठी आधुनिक मशनरी व यंत्रणा नव्हती तेव्हा बाशिच्या खाडीवर उड़ान पूल बांधून नवी मुंबई शहराची सुरुवात केली गेली. १९६६ साली नवीन शहर कायदा अस्तित्वात आणण्यासाठी महाराष्ट्र रिजनल अंड टाऊन प्लॅनिंग ॲक्ट मंजूर करण्यात आला. या कायद्याअंतर्गत नवी मुंबई चा जन्म झाला. १७ मार्च १९७१ साली नवी मुंबई शहर स्थापनेकरिता भारतीय कंपनी कायदा १९५६ अन्वये सिटी इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट कार्पोरेशन सिडकोची स्थापना करण्यात आली. नवी मुंबई बसविण्याकरिता ८० गावाचे पुनर्वसन करून ७ हजार १०० एकर जमीन सिडकोने संपादित केली व नवी मुंबई ची निर्मिती केली.

आज नवी मुंबई ची लोकसंख्या सुमारे २ कोटी ६० लाखापेक्षा अधिक आहे या शहराच्या क्षेत्राखाली वाशी, नेरूळखेरीज बेलापूर, खारघर, सानपाडा, तुर्भे, पासोली, कोपरखैरणे आणि एरोली एवढा भाग येतो. जर वसंतराव नाईक यांनी नवी मुंबई वसवण्याचा निर्णय घेतला नसता तर ही सगळी लोकसंख्या मुंबई शहरावर कोसळली असती. १९५८ साली सुरू झालेला नवी मुंबई चा पहिला आराखडा नाईक साहेबांनी अंतिम स्वरूपात नेल्याने आता परिपूर्ण आणि अध्यावत शहर म्हणून नवी मुंबई ची गणना जगाच्या नकाशात केली जात आहे म्हणूनच खऱ्या अर्थाने नवी मुंबईचे शिल्पकार वसंतराव नाईक साहेब हेच आहेत.

**निष्कर्ष :-**

हरीत क्रांतीचे प्रणेते महानायक, माजी मुख्यमंत्री वसंतरावजी नाईक यांनी महाराष्ट्र राज्याच्या जडणघडणीसाठी फार मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्र राज्याच सर्वांगीन विकास व्हावा यासाठी त्यांनी त्यांच्या कार्यकाळात विविध विकासत्मक योजन अमलात आणल्या. सोबतच त्यांनी सामाजिक कार्यात सुध्दा सहभाग घेतला. समाजातील उपेक्षित घटकांकडे त्यांनी विशेष लक्ष दिले. ते ज्या बंजारा समाजातून आले होते तो समाज शैक्षणिक, सामाजिक दृष्ट्या दुर्बल होता त्याला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यामुळे

आज या समाजातील अनेक प्रतिभावंत आणि प्रज्ञावंत तरुण विविध क्षेत्रात तेजाने तळपत आहेत यांचे श्रेय हे वसंतराव नाईक साहेब यानांच दयावे लागते. आणि एकुणच या तरुण वर्गांनी आधुनिक महाराष्ट्राच्या जडणघडणीत बळ दिल्याचे दिसले.

### संदर्भग्रंथ

१) लोकराज्य - डिसेंबर २०१२, पृ.क्र. ५.
२) रुद्रवार अ. गो. ( स्मरणिका), व. ना. स्मृ.प्र.पु. २००२ पृ.क्र. १४.
३) कित्ता - पृ.क्र. २४.
४) कित्ता - पृ.क्र.२६.
५) राठोड राजाराम, (सं.पा.) - हिरवी क्षितीजे १९८७ - पृ.क्र. ६.
६) दर्डा विजय, लोकमत, (सं.पा.) व.ना.ष.पू.वि. १९७३ - पृ.क्र.११.
७) महाराष्ट्र टाईम (सं.पा.) १९७३ पृ.क्र. ७.
८) दर्डा विजय, लोकमत (सं.पा.) व.ना.ष.पू.वि. १९७३ - पृ.क्र.३.
९) राठोड राजाराम, (सं.पा.) हिरवी क्षितीजे १९८७ पृ.क्र.१५.
१०) चव्हाण संजय, स्मरणिका (सं.पा.) व.ना.स्मृ.प्र.पु.२००२ पृ.क्र. १५..
११) प्रा.निसर्ग आडे (स.पा.) १८ ऑगस्ट २०२२